VPCCECM

**SYBABED Semester End Examination (Regular/Repeat)**

April - May 2023

**Course Title:** मराठी कविता, अलंकार आणि कार्यालयीन पत्रव्यवहार

**Subject:** Marathi **Course Type:** Elective Marathi

**Semester:** IV **Duration:** 2 Hours **Max Marks:** 70

---

सूचनाः १. सर्व प्रश्न सोडविणे बंधनकारक आहे.

२. उजव्या हाताकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

३. प्रत्येक नवीन प्रश्नांचे उत्तर नवीन पानावर सुरु करावे.

---

**प्र. १. पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **( ३ X ५ = १५ )**

क. कवितेच्या कोणत्याही दोन व्याख्या लिहा.

ख. कवितेचा 'भाषा' हा घटक स्पष्ट करा.

ग. 'अहि - नकुल' या कवितेतील प्रतिकात्मकता स्पष्ट करा.

घ. 'नाही' कवितेचा आशय लिहा.

ङ. 'मातीचे गायन' या कवितेत माती आकाशाला कोणती विनंती करते ?

**प्र. २. पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **( ३ X ५ = १५ )**

च. 'जालियनवाला बाग' या कवितेचे विशेष लिहा.

छ. तुम्ही कवि असता तर 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेचा शेवट कसा केला असता?

ज. 'बोलगाणी' या कविता संग्रहातील कोणत्याही एका प्रेम कवितेचा भावार्थ लिहा.

झ. शब्द अलंकार आणि अर्थ अलंकारांचा परिचय करा.

ञ. स्मरण पत्र लेखनाचा उद्देश लिहा.

**प्र. ३. कोणत्याही दोहोचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.** **( २ X ५ = १० )**

ट. "दगडावर दिसतिल अजुनि तेथल्या टाचा
ओढ्यात तरंगे अजुनि रंग रक्ताचा
क्षितिजावर उठतो अजुनि मेघ मातीचा
अद्याप विराणी कुणि वाऱ्यावर गात
वेडात मराठे वीर दौडले सात"

ठ. “गुहेत गेलो मी पापाच्या
आणि भेटलो पापाला
दात शोधला मी जहराचा
दातच नव्हते सापाला”

ड. “दुर्बळ भेकड!
त्वेषाने पुकारी
घुमले पहाड
घुमल्या कपारी”

ढ. “आणि येताना पवाडे संस्कृतीचे गा जरा,
डोलु द्या सारी धरा,
मेघमालेतून आम्हा शांततेचे द्या धडे
जा जरा पूर्वेकडे”

**प्र. ४. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (१ X १० = १०)**

त. ‘‘रसयात्रा’ कविता संग्रहाचे भाषिक विशेष लिहा.

थ. ‘रसयात्रा’ कवितासंग्रहात आशयाची विविधता आहे.’ विधान सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र. ५. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (१ X १० = १०)**

प. ‘‘बोलगाणी’ हा कवितासंग्रह जीवनाकडे सकारात्मकतेने पहावयास शिकवितो.’ विधान सोदाहरण स्पष्ट करा

फ ‘बोलगाणी’ कविता संग्रहातील अलंकारांचा परामर्श घ्या.

**प्र. ६. य. एका महिन्यापूर्वी तूम्ही शब्दांगण प्रकाशनाकडे काही पुस्तकांची मागणी केली होती. ती पुस्तके अद्याप तुम्हाला मिळाली नाहीत. त्यासंदर्भात स्मरण करणारे पत्र लिहा. (१ X ६ = ६)**

**प्र. ६. र. पुढीलपैकी कोणत्याही दोन अलंकारांचा उदाहरणासह परिचय करा. (२ X २ = ४)**

स. श्लेष

ह. प्रतिक

ळ. अनुप्रास

---